प्रहार रविवार, ९ नोव्हेंबर २००८

# शब्दांपासून शब्दांपलीकडे

आशुतोष आपटे

कोणतंही पुस्तक म्हटलं की, सर्वप्रथम आपल्या मनात प्रतिबिंब उमटतं ते शब्दांचं! पुस्तक म्हणजे शब्द! शब्दांचा संग्रह असलेलं लिखाण. मग ते कलेवरचं पुस्तक असो अथवा कलेवरावरचं! आपणास शब्दांचीच मांडणी अभिप्रेत असते. कारण शब्द आपल्यात इतके भिनलेले असतात की, आपण शब्दातीत विचारही करू शकत नाही आणि शब्दातीत आस्वादही घेऊ शकत नाही. इतकं आपलं जगणं शब्दांनी पांगळं केलेलं असतं.




खरं म्हणजे कोणतंही पुस्तक आपण प्रथम पाहतो. मग स्पर्श करतो. त्याच्या गुळगुळीत किंवा खरखरीत पानांनी आपल्या बोटांना ते ज्ञात होतं. त्या नव्या कोऱ्या पुस्तकाचा त्याचा स्वतःचा असा वास असतो. मग ते पुस्तक आपण चाळतो. त्यात चित्रं असतील, तर त्यातल्या भल्याबुऱ्या चित्रांकडे आपलं लक्ष जातं. नंतर त्यातले शब्द आपण पाहतो. त्यातल्या काही शब्दांवर आपण वाक्यरूपाने फोकस करतो आणि वाचावयास सुरुवात करतो. म्हणून पुस्तक म्हणजे प्रथम दृश्य, स्पर्श आणि शेवटी शब्द! वाचता वाचता ते शब्द अर्थप्रवाही होत जातात, तसतसं आपल्या मनात उमटत जातं त्या शब्दांनी केलेलं दृश्य-श्राव्य किंवा इतर संवेदनांचं चित्रण.

म्हणून शब्द म्हणजे कोडिंग असतं, त्या लेखकाने अनुभवलेल्या संवेदनांचं. आपण वाचतो तेव्हा त्या संवेदना डीकोड होत जातात. आपल्या अनुभवविश्वानुरूप त्या डीकोड होत जातात आणि लेखकाचं अनुभवविश्व आपल्या अनुभवविश्वात सामावलं जाऊ लागतं. एखाद्या संगणकावरून दुसऱ्या संगणकावर कॉम्प्रेस करून पाठवलेल्या झीप फाईलसारखं शब्दांतून हे मोठ्या आशयाचं अनुभवविश्व कॉम्प्रेस करून आपल्याकडे पाठवलेलं असतं. म्हणून शब्द म्हणजे वाहन. शब्दाशिवाय आपले विचार, अनुभव, संवेदना वगैरे एकाकडून दुसऱ्याकडे पाठवण्यासाठी अधिक सोयीचं वाहन दुसरं

## परीक्षण

कोणतंच नाही. एखादी व्यक्ती आज अस्तित्वात नसली, तरी तिने शब्दांतून मांडलेलं तिचं अनुभवविश्व आपल्याकडे पोहोचू शकतं. हा शब्दांचा सर्वात मोठा सद्गुण. पण मुक्कामाला पोहोचल्यानंतरही त्या वाहनातून न उतरणं, ते शब्दांचं वाहन सोडून न देणं हा आपला सगळ्यात मोठा दुर्गुण.

नुकतंच प्रकाशित झालेलं प्रा. प्रभाकर कोलते यांचं 'कलेपासून कलेकडे' हे पुस्तक शब्दांतूनच लिहिलेलं असलं, तरी मुक्कामी पोहोचल्यावर, एखाद्या कट्टर वाहनचालकासारखं वाहनातून उतरवणारं आहे. पुस्तक वाचल्यावर त्यातले शब्द आपल्या डोळ्यांसमोर तरळत राहात नाहीत, तर शब्दाशब्दांतून कोलतेंनी जागवलेल्या संवेदना आपल्या मनात तरलपणे जागृत होतात, हे या पुस्तकाचं सर्वात मोठं यश आहे.

कोलते नुसतेच प्रथितयश नव्हे, तर भारतातील सर्वात महत्त्वाचे चित्रकार आहेत. तेवढेच महत्त्वाचे कलाशिक्षक आहेत. कलेबद्दल मूलगामी तत्त्वचिंतन करणारे आहेत. मागाहून ते ओघवती भाषा प्राप्त केलेले लेखक आहेत. त्यामुळेच त्यांचं या पुस्तकातील लिखाण म्हणजे दृश्यलेखन आहे. ते लिखाण वाहन चालू असतानाही (पुस्तक वाचन चालू असतानाही) सतत वाहनातून उतरण्याची जाणीव करून देत असतं. अगदी पहिल्याच पानातून ते ही जाणीव करून देतात.

मुळात पुस्तकाची मांडणी, पुस्तकाचा पोत, त्यात मांडलेल्या चित्रांच्या प्रतिमा हे सारंच देखणं आहे. नीटनेटकं आहे. पुस्तक चार विभागांत मांडलेलं आहे. पहिला विभाग पुस्तकाची तोंडओळख करून देणारा आहे. दुसरा विभाग कलेचा सामाजिक व सांस्कृतिक किनाऱ्यांवरून केलेल्या विचारांचा आहे. त्यातून भारताच्या आजपर्यंतच्या कलाप्रवासाचंही समृद्ध चिंतन मांडलेलं आहे.

तिसरा विभाग कोलतेंना भावलेल्या चित्रकारांविषयी आहे. पळशीकर, हुसेन, गायतोंडे, बरवे, सुझा आणि मनजीत बावा हे ते चित्रकार. यातून कोणताही हातखंड न राखता या चित्रकारांच्या चित्रांचं आणि विचारांचं सुंदर रसग्रहण केलेलं आहे. हे रसग्रहण शब्दांनी ऊहापोह करूनसुद्धा आपल्याला शब्दातीत संवेदनांकडे घेऊन जाणारं आहे. याचबरोबर त्या-त्या चित्रकारांच्या चित्रांच्या रंगीत प्रतिमाही छापलेल्या आहेत.

चौथ्या विभागात कोलतेंच्या स्वतःच्या चित्रकार म्हणून जडणघडणीविषयी भाष्य आलेलं आहे. कोलतेंसारखा चित्रकार घडतो कसा, कुठले कुठले घटक त्यावर आपलं संस्करण करत असतात, हे त्यातून उलगडत जातं.

एकंदरित हे पुस्तक कला विद्यार्थ्यांना अभ्यासनीय आहेच, पण कलाकारांनाही शब्दांमुळे बोथट झालेल्या संवेदना धारदार करून घेण्यासाठी हे पुस्तक निश्चित उपयोगी पडेल आणि त्याहून सर्वात मोठा घटक म्हणजे सर्वसामान्य माणूस, ज्याला आजची मॉडर्न कला म्हणजे काय, असा कुचेष्टात्मक भेसूर प्रश्न पडलेला असतो आणि त्याचं समाधान करणारं एकही पुस्तक प्रकाशित झालेलं नव्हतं. ते महत्त्वाचं काम कोलतेंचं हे पुस्तक सहज करू शकेल. कारण सामान्यांना कळेल अशा शब्दांतूनच शब्दांपलीकडे नेण्याची ताकद या एकमेव पुस्तकात आहे.

या पुस्तकाचं संपादन व प्रस्तावना लेखन रत्नाकर मतकरी यांनी केलं आहे. हेच पुस्तक राजलक्ष्मी पंडित यांनी इंग्रजीतही अनुवादित केलेलं आहे. जेसल ठक्कर या चित्रकलेच्याच विद्यार्थिनी. त्यांनी 'बोधना आर्टस् फाऊंडेशन' ही भारतीय कलेतील विचारधारा व निर्मिती प्रकाशित करण्यासाठी ध्येयाने स्थापलेली संस्था! त्या जेसल ठक्कर व 'बोधना'ला एवढं छान पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद!

*'कलेपासून कलेकडे'*
*लेखक : प्रभाकर कोलते*
*संपादन : रत्नाकर मतकरी*
*प्रकाशक : बोधना आर्टस् फाऊंडेशन*
*पृष्ठे : १६१*
*किंमत : ४९५ रुपये*